RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक २६] शुक्रवार, एप्रिल १०, २०२६/चैत्र २०, शके १९४८ [पृष्ठे १३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ४६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र सागरी मंडळ**

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४, रामजीभाई कमानी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१, दिनांक १० एप्रिल २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सागरी मंडळ अधिनियम, १९९६.**

क्र. मसामं/मुकाअ/महसूल/२०२६.— महाराष्ट्र सागरी मंडळ अधिनियम, १९९६ (१९९७ चे १५) मधील कलम १०८ उप-कलम (३३), कलम २०, २४, ३५, ३७, ३८, ४१, १०९ चे उप-कलम (१) आणि कलम १११ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनी आणि याबाबत शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढीलप्रमाणे “महाराष्ट्र सागरी मंडळ (जाहिरातींच्या प्रदर्शनाचे विनियमन) विनियम, २०२६” करीत आहे :—

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ**

(१) या विनियमांस “महाराष्ट्र सागरी मंडळ (जाहिरातींच्या प्रदर्शनाचे विनियमन) विनियम, २०२६” असे म्हणावे.

(२) हे विनियम महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अधिकारक्षेत्रातील सर्व क्षेत्रांकरिता लागू राहतील.

(३) हे विनियम **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या**

या नियमांमध्ये, संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसल्यास,—

(१) “**जाहिरात**” म्हणजे महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अधिकारक्षेत्रात कोणत्याही प्रकारे प्रदर्शित करण्यात येणारी कोणतीही जाहिरात होय आणि त्यात पोस्टर, होर्डिंग फलक, बॅनर, तात्पुरत्या कमानी, प्रकाशमान चिन्हे, नामफलक, दिशादर्शक फलक, डिजिटल फलक, स्काय साइन, प्लॅकार्ड, डिजिटल, एलईडी, एलसीडी, बॅकलिट बोर्ड, निऑन डिस्प्ले, इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले,

व्हिडिओ डिस्प्ले, लेझर शो, फुगे इत्यादी कोणत्याही साधनांद्वारे शब्द, अक्षरे, नमुना, चिन्ह, सूचना किंवा घोषणा स्वरूपात सादर केलेले कोणतेही साधन किंवा प्रतिकृती यांचा समावेश होईल. खालीलप्रमाणे त्यांची व्याख्या करण्यात येते :–

(अ) "**फुग्यांवरील जाहिरात**" म्हणजे वायूने भरलेले व हवेत तरंगणारे हवाई फुग्यांवरील जाहिरात.

(ब) "**बॅनरवरील जाहिरात**" म्हणजे सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शनासाठी कापड किंवा अन्य कोणत्याही साहित्यावर केलेली जाहिरात, घोषणा किंवा लिखित मजकूर.

(क) "**डिजिटल/इलेक्ट्रॉनिक प्रदर्शनावरील जाहिरात**" म्हणजे संरचनेवर बसविलेला इलेक्ट्रॉनिक पद्धतीने चालणारा जाहिरात फलक.

(ड) "**स्टॅण्डीवरील जाहिरात**" म्हणजे लहान काँक्रीट बेस किंवा खांबावर बसविलेल्या साधनाद्वारे उत्पादन किंवा कार्यक्रमाच्या प्रसारासाठी प्रदर्शित करण्यात येणारी जाहिरात होय. अशा जाहिराती सामान्यतः किरकोळ विक्री केंद्रे, खरेदी मॉल्स आणि कार्यक्रम स्थळे यांसारख्या गर्दीच्या ठिकाणी लक्ष वेधण्यासाठी व दृश्यदृष्ट्या आकर्षक प्रचार साधन म्हणून लावण्यात येतात.

(इ) "**इलेक्ट्रॉनिक बिलबोर्डवरील जाहिरात**" म्हणजे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने चालणाऱ्या फलकावरील जाहिरात.

(फ) "**ग्लो साइन बॉक्सवरील जाहिरात**" म्हणजे धातूच्या पेटीवर बसविलेल्या पारदर्शक किंवा अर्धपारदर्शक पत्र्यावर मागील बाजूस विद्युत दिव्यांद्वारे प्रकाशित केलेली जाहिरात.

(ग) "**होर्डिंगवरील जाहिरात**" म्हणजे जमिनीवर उभारलेल्या संरचनेच्या कोणत्याही पृष्ठभागावर किंवा इमारतीच्या छताच्या कोणत्याही भागावर अथवा कागदावर अक्षरे, शब्द किंवा चित्रे लावून कोणत्याही प्रकारे प्रदर्शित करण्यात येणारी जाहिरात होय. अशी जाहिरात कोणत्याही स्थळ, व्यक्ती, सार्वजनिक कार्यक्रम किंवा कोणत्याही व्यापारी वस्तूबाबत माहिती देण्यासाठी किंवा जनतेचे लक्ष वेधण्यासाठी करण्यात येते. यांना बिलबोर्ड असेही संबोधले जाते.

(घ) "**युनिपोलवरील जाहिरात**" म्हणजे एकाच खांबासारख्या आधारावर उभारण्यात येणाऱ्या होर्डिंगचा प्रकार होय. अशाप्रकारच्या संरचनेला युनिपोल असे संबोधले जाते.

(च) "**रॅप्सवरील जाहिरात**" म्हणजे कागद किंवा इतर कोणत्याही साहित्यावर केलेली जाहिरात, घोषणा किंवा प्रदर्शनासाठी असलेला मजकूर, जो विद्यमान पायाभूत संरचनेच्या पृष्ठभागावर चिकटविण्यात किंवा लावण्यात येतो.

(छ) "**कॅन्टिलिव्हरवरील जाहिरात**" म्हणजे एका टोकाला आधार/स्थिर केलेला आणि दुसऱ्या टोकाला लांब अधांतरी भागावर भार किंवा उभा आधार धारण करणारा लांब दांडा/संरचना, जी रस्त्याच्या दुभाजक किंवा पदपथ/फुटपाथवर उभारलेल्या संरचनेचा (भागाचा) आधार धरण्यासाठी तसेच रस्त्यावरील दिशादर्शक फलक/स्थळे किंवा जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी वापरली जाते.

(ज) "**बिल्डिंग रॅप जाहिरात**" म्हणजे बांधकामाधीन किंवा दुरुस्तीअंतर्गत इमारतीच्या स्कॅफोल्डिंगवर प्रदर्शित केलेली जाहिरात.

(झ) "**जाहिरात किऑस्क**" म्हणजे जमिनीवर थेट बसविण्यात येणारी स्वतंत्र (फ्री-स्टॅण्डिंग) जाहिरातीची संरचना होय, जी खांबावर बसविलेली नसते. संरचना व नियमांनुसार यांना लॉलीपॉप्स, मिनी पोल्स इत्यादी विविध नावांनी देखील ओळखले जाते.

(ञ) "**वाहनावरील (उभे/पार्क केलेले) जाहिरात**" म्हणजे एमएमबीच्या मालकीच्या जागा/मालमत्तेवर वाहन उभे असताना, जाहिरात दृश्यमान होईल अशाप्रकारे वाहनाच्या बाजूच्या पॅनलवर किंवा मागील बाजूस स्टिकरद्वारे बसविण्यात आलेला एकतर्फी किंवा द्वितर्फी जाहिरात फलक होय.

(ट) "**बार्ज**" म्हणजे सपाट तळाची, बहुधा स्वतंत्र प्रेरणाशक्ती नसलेली मालवाहू नौका.

(ठ) "**जाहिरात साधन**" म्हणजे बाह्य जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी वापरले जाणारे कोणतेही माध्यम. स्पष्टीकरणार्थ, अशा साधनांमध्ये मोटारीकृत किंवा अमोटारीकृत वाहने तसेच जाहिरात प्रदर्शनासाठी वापरण्यात येणारे मानवी साधन यांचाही समावेश असेल.

(ड) "**पोल किऑस्क**" म्हणजे विद्युत किंवा प्रकाश खांबांवर बसविलेले जाहिरात साधन.

(ढ) "**पोस्टर**" म्हणजे सार्वजनिक ठिकाणी जाहिरातीसाठी वापरलेले कागद किंवा इतर साहित्याचे पत्रक.

(ण) "**तात्पुरती जाहिरात**" म्हणजे मर्यादित कालावधीसाठी तातुरत्या संरचनेवर (फ्रेम), बॅनर, कट-आऊट, गेट इत्यादी) प्रदर्शित करण्यात येणारी जाहिरात होय. निर्धारित कालावधी समाप्त झाल्यानंतर अशी जाहिरात तसेच संबंधित संरचना काढून टाकण्याचा उद्देश असतो.

(२) "**जाहिरात संस्था किंवा एजन्सी**" म्हणजे जाहिरात तसेच व्यापक अर्थाने विपणन क्षेत्रात विशेष सेवा प्रदान करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली स्वतंत्र संस्था.

(३) "**जाहिरात प्रदर्शन पायाभूत सुविधा/ जाहिरात फलक व होर्डिंग/ जाहिरात संरचना**" म्हणजे जाहिरात करणे, माहिती देणे किंवा कोणतेही ठिकाण, व्यक्ती, सार्वजनिक कार्यक्रम, वस्तू किंवा व्यापारिक मालाकडे जनतेचे लक्ष वेधण्यासाठी, अक्षरे, चिन्हे किंवा चित्रे लावून बाह्य ठिकाणी कोणत्याही प्रकारे प्रदर्शित केलेली कोणतीही पृष्ठभाग किंवा संरचना; तसेच अशी पृष्ठभाग किंवा संरचना जी कोणत्याही इमारतीस जोडलेली, तिचा भाग असलेली किंवा संबंधित असलेली, किंवा झाड, जमीन, खांब, पडदा, कुंपण, होर्डिंग यांवर निश्चित केलेली, किंवा मोकळ्या जागेत अथवा महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अधिकारक्षेत्रातील कोणत्याही जलाशयात किंवा त्यावर प्रदर्शित केलेली असेल.

(४) "**प्राधिकरण किंवा परवानादाता**" म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ (एमएमबी) किंवा त्यांच्याकडून विधिवत प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी.

(५) "**शुल्क**" म्हणजे एजन्सीकडून प्राधिकरणास देय असलेले प्रीमियम शुल्क व किमान परवाना शुल्क यांची एकत्रित रक्कम.

(६) "**जाहिरात परवाना किंवा परवाना**" म्हणजे जाहिरात लावण्यासाठी प्राधिकरणाकडून देण्यात आलेली परवानगी.

(७) "**स्थानिक प्रशासन**" म्हणजे संबंधित जाहिरात स्थळाच्या शहर, जिल्हा, तालुका किंवा गावाच्या प्रशासनासाठी जबाबदार असलेले, महाराष्ट्र सागरी मंडळाव्यतिरिक्त इतर प्राधिकरण.

(८) "**किमान परवाना शुल्क**" म्हणजे या विनियमांच्या विनियम ६ अन्वये प्राधिकरणाने निर्धारित केलेले किमान दर.

(९) "**एमएमबी**" म्हणजे महाराष्ट्र सागरी मंडळ.

(१०) "**प्रीमियम शुल्क**" म्हणजे निविदा प्रक्रियेदरम्यान एजन्सीने उद्धृत केलेले व प्राधिकरणाने मान्य केलेले, किमान परवाना शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त शुल्क.

(११) "**लावणे किंवा जाहिरात लावणे**" म्हणजे कोणतीही जाहिरात उभारणे, प्रदर्शित करणे, बसविणे, निश्चित करणे, कायम ठेवणे किंवा कोणत्याही प्रकारे जाहिरात दाखविणे.

(१२) या नियमांमध्ये वापरलेले परंतु परिभाषित न केलेले शब्द व अभिव्यक्ती यांना लागू असलेल्या कायद्यांनुसार देण्यात आलेला अर्थ लागू राहील.

**३. जाहिरातींचे प्रकार**

(१) **मोठ्या आकाराच्या जाहिराती (Large-Format Advertisements):** ज्या जाहिरातींचे क्षेत्रफळ २०० चौ.फुटांपेक्षा जास्त व १६०० चौ.फुटांपर्यंत आहे. अशाप्रकारच्या जाहिरात साधनांमध्ये प्रामुख्याने होर्डिंग व युनिपोल यांचा समावेश होतो.

(२) **मध्यम आकाराच्या जाहिराती (Medium-Format Advertisements):** ज्या जाहिरातींचे क्षेत्रफळ ५० ते २०० चौ.फुटांच्या दरम्यान आहे. अशाप्रकारच्या जाहिरात साधनांमध्ये प्रामुख्याने होर्डिंग, युनिपोल, डिजिटल प्रदर्शन फलक व किऑस्क यांचा समावेश होतो.

(३) **लहान आकाराच्या जाहिराती (Small-Format Advertisements) :** ज्या जाहिरातींचे क्षेत्रफळ ५० चौ.फुटांपेक्षा कमी आहे. अशाप्रकारच्या जाहिरात साधनांमध्ये प्रामुख्याने मिनी पोल, पोल किऑस्क व जाहिरात किऑस्क यांचा समावेश होतो.

(४) **वाहनावरील जाहिरात (स्थिर):** महाराष्ट्र सागरी मंडळाच्या मालमत्ता/जमिनीवर वाहन पार्क असताना वाहनाच्या बाजूस किंवा मागील भागावर स्टिकरद्वारे लावलेला एकेरी किंवा दुहेरी बाजूचा जाहिरात फलक, ज्यामुळे वाहन स्थिर असताना जाहिरात स्पष्टपणे दिसून येते.

(५) **नौका/बार्ज/फ्लोटेलवरील जाहिरात :** चालू स्थितीत असलेल्या नौका, बार्ज किंवा फ्लोटेल यांवर बसविलेला किंवा रॅप्स स्वरूपात चिकटविलेला एकेरी किंवा दुहेरी बाजूचा जाहिरात फलक, ज्यामुळे जलवाहन चालू असताना जाहिरात स्पष्टपणे दिसून येते.

(६) **स्ट्रीट फर्निचर जाहिराती :** सार्वजनिक ठिकाणी सार्वजनिक सुविधांसाठी बसविण्यात आलेल्या स्ट्रीट फर्निचर जसे की सार्वजनिक शौचालये, कचरापेट्या, बाके इत्यादींवर लावलेल्या जाहिराती.

(७) **वाहतूक पायाभूत सुविधांवरील जाहिराती (स्थिर):** टर्मिनल इमारत, जेट्टी इत्यादी वाहतूक सुविधांवर किंवा संबंधित पायाभूत संरचनांवर निश्चित केलेल्या जाहिराती.

(८) **हवाई जाहिराती (Aerial Advertisements) :** कोणत्याही कठोर संरचनेचा आधार नसताना हवेत लटकविलेल्या किंवा तरंगत्या स्वरूपात प्रदर्शित केल्या जाणाऱ्या जाहिराती. अशाप्रकारच्या जाहिरातींसाठी गरम हवेचे फुगे, ड्रोन, विमान, पतंग इत्यादी साधनांचा वापर करण्यात येतो.

(९) **तात्पुरत्या जाहिराती (Temporary Advertisements):** अल्प कालावधीसाठी प्रदर्शित केल्या जाणाऱ्या व कार्यक्रम, सभा, अधिवेशन, शिखर परिषद इत्यादींच्या प्रसारासाठी वापरल्या जाणाऱ्या जाहिराती.

(१०) महाराष्ट्र सागरी मंडळाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या इतर कोणत्याही प्रकारच्या जाहिराती.

**४. जाहिरात परवाना मंजुरीची कार्यपद्धती**

(१) महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अधिकारक्षेत्रात कोणतीही जाहिरात उभारणे, प्रदर्शित करणे, बसविणे, निश्चित करणे, कायम ठेवणे किंवा कोणत्याही प्रकारे प्रदर्शित करणे यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस परवानगी राहणार नाही. कोणतीही अनधिकृत व बेकायदेशीर जाहिरात स्थापित केल्यास त्यातून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही हानी, इजा किंवा नुकसानीबाबत होणारा सर्व खर्च व परिणाम यांसाठी संबंधित व्यक्ती किंवा संस्था पूर्णपणे व एकट्याने जबाबदार राहील.

(२) महाराष्ट्र सागरी मंडळास कोणतीही अनधिकृत व बेकायदेशीर जाहिरात काढून टाकणे, तोडणे किंवा तिचे प्रदर्शन प्रतिबंधित करण्याचा अधिकार राहील.

(३) महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अधिकारक्षेत्रात कोणत्याही जाहिरातीचे स्थान किंवा ठिकाण, प्रकार, आकार व इतर संबंधित निकष यांस मान्यता देण्याचा अधिकार महाराष्ट्र सागरी मंडळास राहील. महाराष्ट्र सागरी मंडळास कोणत्याही जाहिरात संरचनेत बदल, पुनर्स्थापन किंवा काढून टाकण्याबाबत निर्देश देण्याचा अधिकार राहील. प्राधिकरणाचे निर्देश अंतिम व सर्व जाहिरातदारांवर बंधनकारक राहतील.

(४) महाराष्ट्र सागरी मंडळ आपल्या अधिकारक्षेत्रात लावण्यांत येणाऱ्या जाहिरातींसाठी योग्य ठिकाणे व जाहिरातींचे प्रकार निश्चित करील.

(५) निश्चित केलेल्या ठिकाणी जाहिरातींसाठी जाहिरात संस्थेची निवड पारदर्शक निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येईल.

(६) निवडलेल्या जाहिरात संस्थेवर जाहिरात लावण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या व मंजुरी प्राप्त करण्याची जबाबदारी राहील. आवश्यक परवानग्या व मंजुरी न घेता जाहिरात लावल्यास त्यासंबंधित सर्व खर्च व परिणामांसाठी संस्था पूर्णपणे व एकट्याने जबाबदार राहील.

(७) निवडलेल्या जाहिरात संस्थेने सर्व घटकांसाठी संरचनात्मक रचना किंवा आराखडे तसेच सविस्तर संरचनात्मक गणना परवानाधारक संरचनात्मक अभियंत्याकडून तयार करून घ्याव्यात व त्यास आयआयटी मुंबई किंवा प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही संस्थेकडून प्रमाणीकरण करून घ्यावे. याव्यतिरिक्त, सुरक्षितता अनुपालन प्रमाणपत्रे दरवर्षी सादर करून त्यास आयआयटी मुंबई किंवा प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या इतर संस्थेकडून प्रमाणीकरण करून घ्यावे.

(८) संस्थेची निवड झाल्याची सूचना प्राप्त झाल्यानंतर पंधरा (१५) दिवसांच्या आत निवडलेल्या संस्थेने प्राधिकरणास खालीलप्रमाणे शुल्क अदा करावे :

(अ) सहा (६) महिन्यांसाठी देय असलेल्या शुल्काइतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून; आणि

(ब) पहिल्या महिन्यासाठी देय असलेले आगाऊ मासिक शुल्क;

(क) जर संस्था पंधरा (१५) दिवसांच्या आत वरीलप्रमाणे रक्कम अदा करण्यात अपयशी ठरल्यास, तिची निवड आपोआप रद्द होईल.

(९) त्यानंतर, निश्चित ठिकाणी जाहिरात उभारण्यासाठी संस्था व प्राधिकरण यांच्यामध्ये करार करण्यात येईल.

(१०) त्यानंतर संस्था प्रत्येक महिन्यासाठी देय असलेले मासिक शुल्क त्या महिन्याच्या पाच (५) तारखेपूर्वी आगाऊ स्वरूपात प्राधिकरणास अदा करील.

(११) देयक भरण्यात विलंब झाल्यास, वार्षिक १८ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल.

(१२) देयक भरण्यातील विलंब तीन (३) महिन्यांपेक्षा जास्त झाल्यास, परवाना रद्द करण्यात येईल व संबंधित जाहिरात संरचनेचा ताबा महाराष्ट्र सागरी मंडळाकडे येईल.

(१३) करारातील अटी व शर्तींचे उल्लंघन नसल्यास परवान्याची मुदत संपल्यानंतर सुरक्षा ठेव कोणतेही व्याज न देता परत करण्यात येईल. अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र सागरी मंडळाने निश्चित केलेली रक्कम सुरक्षा ठेवीतून जप्त करण्यात येईल.

**५. परवान्याचा कालावधी**

(१) कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीसाठी कमाल परवाना कालावधी दहा (१०) वर्षांचा राहील.

(२) परवाना जारी झाल्याच्या दिनांकापासून परवानाधारकास संबंधित प्राधिकरणांकडून आवश्यक सर्व परवानग्या व मंजुरी प्राप्त करण्यासाठी सहा (६) महिन्यांचा कालावधी देण्यात येईल.

(३) वरील सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, जाहिरात संरचना पूर्ण झाली आहे किंवा कार्यान्वित आहे अथवा नाही याचा विचार न करता, दहा (१०) वर्षांचा परवाना कालावधी तात्काळ सुरू होईल. परवानाधारक लागू असलेले परवाना शुल्क सातव्या महिन्याच्या प्रारंभापासून भरण्यास जबाबदार राहील.

(४) परवान्याची मुदत संपल्यानंतर नव्वद (९०) दिवसांच्या आत परवानाधारकाने संबंधित जाहिरात काढून टाकणे बंधनकारक राहील. याबाबत खालील अटी लागू राहतील:

(अ) जाहिरात काढून टाकेपर्यंत परवानाधारकास मासिक शुल्क अदा करणे बंधनकारक राहील.

(ब) वरील अटीचे पालन न केल्यास, देय मासिक शुल्काइतका दंड आकारण्यात येईल तसेच अनुपालन न केल्याबद्दल प्रत्येक महिन्याच्या मासिक शुल्काच्या २५ टक्के इतका अतिरिक्त अधिभार आकारण्यात येईल.

(क) परवान्याची मुदत संपल्यानंतर नव्वद (९०) दिवसांच्या आत जाहिरात न काढल्यामुळे कोणतीही हानी, इजा किंवा नुकसान झाल्यास, त्या सर्व खर्च व परिणामांसाठी संस्था पूर्णपणे व एकट्याने जबाबदार राहील.

(ड) परवान्याची मुदत संपल्यानंतर नव्वद (९०) दिवस उलटल्यानंतर संबंधित जाहिरात अनधिकृत जाहिरात म्हणून गणली जाईल.

**६. किमान परवाना शुल्काची निश्चिती**

(१) किमान परवाना शुल्क हे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे वेळोवेळी घोषित केलेल्या "जाहिरात परवाना शुल्क अनुसूची" अथवा केंद्र किंवा राज्य सरकार, स्थानिक प्रशासन किंवा सरकारी संस्था यांद्वारे निर्धारित केलेल्या इतर संबंधित निकष, शुल्क किंवा दरांच्या आधारे गणना केले जाईल.

(२) निविदा प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या संस्थांनी किमान परवाना शुल्काव्यतिरिक्त ते देण्यास तयार असलेले प्रीमियम शुल्क नमूद करावे.

(३) परवाना कालावधी दरम्यान परवाना शुल्कात दर बारा महिन्यानंतर संचयी पध्दतीने १०% वाढ करण्यात येईल.

**७. छाननी समिती**

किमान परवाना शुल्क निश्चित करण्यासाठी, निविदा दस्तऐवज तयार करण्यासाठी व निविदा तपासणीसाठी महाराष्ट्र सागरी मंडळाव्दारे एक छाननी समिती स्थापन केली जाईल. ह्या समिती मध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश असेल :—

(अ) मुख्य बंदर अधिकारी, एमएमबी– अध्यक्ष

(आ) उप जिल्हाधिकारी, एमएमबी – सदस्य सचिव

(इ) उपसंचालक, नगररचना, एमएमबी – सदस्य

(ई) वित्तीय नियंत्रक-नि- मुख्य लेखा अधिकारी, एमएमबी– सदस्य

(उ) अधीक्षक अभियंता, एमएमबी– सदस्य

**८. तात्पुरत्या जाहिरातींबाबत तरतुदी**

(१) तात्पुरत्या जाहिरातींचे प्रदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने निर्धारित केलेल्या स्वरूपात अर्ज सादर करणे आवश्यक असेल.

(२) परवानगी देण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र सागरी मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

(३) तात्पुरत्या जाहिरातींसाठी आकारले जाणारे शुल्क हे तात्पुरत्या जाहिरातीच्या दिवसांनुसार गणना करून किमान परवाना शुल्क असेल.

(४) तात्पुरत्या जाहिरातींसाठी आवश्यक असलेले सर्व परवाने आणि मंजुरी अर्जदाराने स्वतः प्राप्त करणे बंधनकारक आहे.

**९. परवानाधारकाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

(१) परवानाधारकाने रचनात्मक सौंदर्याच्या दृष्टीने जाहिरातींचा आराखडा सुनिश्चित करावा आणि त्या सदैव स्वच्छ, नीटनेटक्या व सुरक्षित स्थितीत राहतील, याची दक्षता घ्यावी.

(२) परवाना धारकाने अश्लील, भडक किंवा कोणताही आक्षेपार्ह संदेश असलेली जाहिरात प्रदर्शित होऊ दिली जाणार नाही याची खात्री करावी.

(३) जाहिराती ह्या भारतीय जाहिरात मानक परिषदेची (Advertisement Standards Council of India) मार्गदर्शक तत्त्वे तसेच इतर लागू असलेल्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणाऱ्या असाव्यात.

(४) परवानाधारकाने जाहिरातीच्या तळाशी कोपऱ्यावर परवानाधारकाचे नाव व परवाना क्रमांक निश्चित केलेल्या मापात लावावा, जेणेकरून परवानाधारकाची ओळख सहज शक्य होईल. तसेच, परवान्याचा कालावधी समाप्त होण्याचा महिना व वर्ष चिन्हांत (उदा. ९/२५ म्हणजे सप्टेंबर २०२५, ७/२६ म्हणजे जुलै २०२६) दाखवावा. परवाना क्रमांक, परवानाधारकाचे नाव व संपर्क क्रमांक देखील स्पष्टपणे लावणे आवश्यक आहे. परवानाधारकाच्या नावाचा अक्षरांचा आकार असा असावा की तो जाहिरातीच्या तळापासून स्पष्टपणे वाचता येईल.

(५) परवाना कालावधीत, परवानाधारकाने प्राधिकरणाने निर्धारित केलेली सार्वजनिक दायित्व विमा पॉलिसी घेतली पाहिजे, जी मृत्यू, इजा किंवा मालमत्तेच्या हानीसंबंधी तृतीय पक्षांच्या हक्क, हितसंबंध आणि जबाबदाऱ्यांसाठी असावी.

**११. सामान्य अटी**

(१) परवाना कालावधीत प्राधिकरणाची परवानगी न घेता जाहिरातीत कोणतेही बदल करण्यास परवानगी नसेल.

(२) एजन्सीकडून करारातील अटी व शर्ती तसेच परवान्याचे कोणतेही उल्लंघन झाल्यास, या संदर्भात जारी केलेल्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या कालावधीत एजन्सीने सदर उल्लंघन दुरुस्त केले नाही तर महाराष्ट्र सागरी मंडळास परवाना रद्द करण्याचा अधिकार राहील.

(३) परवाना धारकाकडून कोणत्याही परिस्थितीत परवाना इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला उपभाडेपट्टीने देणे किंवा हस्तांतरित करणे अनुज्ञेय राहणार नाही.

(४) जाहिरातीस कोणत्याही कारणास्तव होणाऱ्या नुकसानासाठी किंवा हानीसाठी महाराष्ट्र सागरी मंडळ जबाबदार राहणार नाही.

**प्रदीप पी,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

# MAHARASHTRA MARITIME BOARD

Indian Mercantile Chambers, 2nd Floor, 14, Ramjibhai Kamani Marg,
Ballard Estate, Mumbai 400 001.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MARITIME BOARD ACT, 1996.

No.MMB/CEO/Revenue/2026 .—In exercise of the powers conferred by sub-section (*33*) of Section 108, Sections 20, 24 and 35 read with Sections 37, 38 and 41, sub-section (1) of Section 109 and Section 111 of the Maharashtra Maritime Board Act, 1996 (15 of 1997), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the Maharashtra Maritime Board (Regulation of display of Advertisements) Regulations, 2026 as follows, namely: –

**1. Short title, extent and commencement**

(1) These Regulations may be called the Maharashtra Maritime Board (Regulation of display of Advertisements) Regulations, 2026.

(2) These Regulations shall apply to the areas falling under the jurisdiction of the Maharashtra Maritime Board.

(3) These Regulations shall come into force from the date of publication of this regulation in the *Official Gazette*.

**2. Definitions**

In these regulations, unless the context otherwise specifies—

(1) **"Advertisement"** means the display of any advertisement in the jurisdiction of the Maharashtra Maritime Board and includes any device or representation in any manner such as announcement or direction by word, letter, model, sign by means of posters, hoarding boards, banners, temporary arches, illuminated signs, name boards, direction boards, digital boards, sky sign, placard, digital, LED, LCD, Backlit Board, Neon Display, Electronic display, Video Display, Laser Show, Balloons etc., within jurisdiction of Maharashtra Maritime Board. The same are defined as under :—

a. **"Advertisement on Balloons"** means advertisement on air balloons (hot), which are filled with gas and float in the air.

b. **"Advertisement on Banner"** means cloth or any other material that contains an advertisement or announcement, or written matter for display in a public place.

c. **"Advertisement on Digital/ Electronic Display"** means an electronically operated advertisement display fixed on a structure.

d. **"Advertisement on a Standee"** means a display used to promote a product or event mounted on a small concrete base or pole. They are commonly placed in high-traffic areas, such as retail stores, shopping malls, and event venues, to grab attention and create a visually engaging promotional tool.

e. **"Advertisement on an Electronic Billboard"** means electronically operated advertisements on a Board.

f. **"Advertisement on Glow Sign Box"** means an advertisement displayed on a transparent or translucent sheet of any plastic or other material, mounted on a metal sheet box, illuminated from behind using electrical lamps.

g. **"Advertisement on Hoarding"** means any surface of a structure erected on ground or any portion of the roof of a building or on paper, with characters, letters, or illustrations applied thereto and displayed in any manner whatsoever for advertising or to give information regarding or to attract the public to any place, person, public performance, article of mercantile whatsoever. They are also referred to as Billboards.

h. **"Advertisement on Unipole"** means a type of hoarding with a single pole-like support, hence the name Unipole.

i. **"Advertisement on Wraps"** means paper or any other material, which contains an advertisement or announcement, or written matter for display, that is stuck/pasted to a surface of existing infrastructure.

j. **"Advertisement on a Cantilever"** means a long bar supported/fixed at one end and carrying a load/vertical support at the other end of a long unsupported portion used to hold the structure (portion) erected on the divider of the road or the foot path/pavement for display of road direction/places or advertisement.

k. **"Building wrap advertisement"** means an advertisement displayed on the scaffolding of a building under construction or repair.

l. **"Advertisement Kiosks"** means a type of free-standing advertisement which is fixed to the ground instead of a Pole. These are also known by various other names, such as Lollypops, Mini poles, etc., based on configuration and norms.

m. **"Advertisement on Vehicle (Parked)"** means a single or double-sided advertisement board affixed by means of a sticker on the side panel or behind a vehicle in a manner that the advertisements draw visibility while the vehicle is parked on the MMB property/land.

n. **"Barge"** means a flat-bottomed cargo transporter, often without independent propulsion.

o. **"Advertisement Device"** means any advertisement medium used to display an outdoor advertisement. For clarification, such Outdoor advertisement devices shall include motorised, non-motorized vehicles and humans wherever used for the display and dissemination of advertisements.

p. **"Pole Kiosks"** means advertisement devices fixed to Poles – mainly electric or light poles.

q. **"Poster"** means a sheet of paper or any other material used to advertise in public places.

r. **"Temporary Advertisement"** means such advertisement which is displayed on a Temporary structure (Frame, Banner, Cut-out, Gate, etc.) for a limited duration with the intent to discontinue such advertisement as well as structure upon the expiration of the time period.

(2) **"Advertising Agency or Agency"** means an independent entity established to provide specialized services in advertising and, more broadly, in marketing.

(3) **"Advertising Display Infrastructure / Advertising Sign and Hoarding/ Advertisement Structure"** means any surface or structure with characters, letters or illustrations applied there to and displayed in any manner whatsoever outdoors for the purpose of advertising or giving information or to attract the public to any place, person, public performance, article or merchandise, and which surface or structure is attached to, forms part of, or is connected with any building, or is fixed to a tree or to the ground or to any pole, screen, fence or hoarding or displayed in space, or in or over any water-body included in the jurisdiction of the Maharashtra Maritime Board.

(4) **"Authority or Licensor"** means Chief Executive Officer, Maharashtra Maritime Board (MMB) or an Officer duly authorised by him.

(5) **"Fees"** means the sum of Premium Fees and the Minimum License Fees, as payable by the Agency to the Authority.

(6) **"Advertisment License or License"** means permission accorded by the Authority for the installation of the advertisement.

(7) **"Local Administration"** means the authority, other than Maharashtra Maritime Board, responsible for the administration of the city, district, taluka, or village of the place of Advertisement, as applicable.

(8) **“Minimum License Fees”** means the minimum rates prescribed by the Authority as per Regulation 6 of these Regulations.

(9) **“MMB”** means Maharashtra Maritime Board.

(10) **“Premium Fees”** means the Premium Fees quoted by the Agency and agreed by the Authority during the bidding process, over and above the Minimum License Fees.

(11) **“Installation or Installation of Advertisement”** means to erect, exhibit, fix, or retain any Advertisement or display any Advertisement in any manner whatsoever.

(12) The words and expressions used but not defined in these regulations shall have the meaning assigned to them in the applicable laws.

**3. Types of Advertisements**

(1) **Large-Format Advertisements :** Advertisements which are having area of more than 200 sq. ft. up to 1600 sq. ft. These types of advertisement devices are often Hoardings and Unipoles.

(2) **Medium-Format Advertisements :** Advertisements which are having area between 50 - 200 sq. ft. These types of advertisement devices are often Hoardings, Unipole, Digital display, and Kiosks.

(3) **Small-Format Advertisements :** Advertisements which are having area of less than 50 Sqft. These types of advertisement devices are often Mini poles, Pole Kiosks, and Advertisement Kiosks.

(4) **Advertisement on Vehicle (Parked) :** Advertisements that have a single or double-sided advertisement board affixed by means of a sticker on the side panel or behind a vehicle in a manner that the advertisements draw visibility while the vehicle is parked on the Maharashtra Maritime Board property/land.

(5) **Advertisement on Vessels/Barges/Floatels :** Means a single or double-sided advertisement board affixed or Wraps on a vessel in a manner that the advertisements draw visibility while the vessel/Barges/Floatels is plying.

(6) **Street Furniture Advertisements :** Advertisements which are placed on street furniture installed for public conveniences in public places such as public toilets, dustbins, benches, etc.

(7) **Advertisements at Transit Infrastructure (Static) :** These advertisements are located at transit facilities and fixed to infrastructure such as the Terminal building, Jetty, etc.

(8) **Aerial Advertisements :** Means advertisements which are suspended/floated in the air without any means of a rigid structure. These types of advertisement devices use hot air balloons, drones, planes, kites, etc.

(9) **Temporary Advertisements :** Means advertisements which are displayed for shorter periods and are used for advertising events, meetings, conclaves, summits, etc.

(10) Any other Advertisement as prescribed by the Maharashtra Maritime Board.

**4. Procedure for Grant of Advertising License**

(1) No person or entity shall erect, exhibit, fix, or retain any Advertisement or display any Advertisement in any manner whatsoever within the jurisdiction of the Maharashtra Maritime Board without the prior permission of the Maharashtra Maritime Board. The person or entity who has done the installation of any unauthorised and illegal advertisement shall be fully and solely responsible for all the costs and consequences of any damage, injury or loss incurred due to such unauthorised and illegal advertisement.

(2) Maharashtra Maritime Board shall have the power to remove, dismantle, or prohibit the display of any unauthorised and illegal advertisement.

(3) The approval for placement or location of any advertisement under Maharashtra Maritime Board’s jurisdiction, their types and sizes and any other relevant parameters, shall be provided by

Maharashtra Maritime Board. Maharashtra Maritime Board can issue directions for alteration, re-positioning or removal of any advertisement structure. The directions of the Authority are final and binding on all advertisers.

(4) Maharashtra Maritime Board will identify suitable locations for advertisements and types of advertisements to be installed under Maharashtra Maritime Board's jurisdiction.

(5) Selection of the Advertising Agency for advertisement in identified locations shall be done by a transparent bidding process.

(6) The selected Advertising Agency shall be responsible for obtaining all requisite permissions and approvals for the installation of the advertisement. The selected Advertising Agency shall be fully and solely responsible for all the costs and consequences of the installation of the advertisement without obtaining all requisite permissions and approvals.

(7) The selected Advertising Agency shall ensure that the structural design and/or plans, along with detailed structural design calculations, are prepared and approved by a licensed structural engineer, and duly vetted by IIT Mumbai or any other agency approved by the Authority, for all components. Additionally, Safety Compliance Certificates shall be submitted annually and duly vetted by IIT Mumbai or any other agency approved by the Authority.

(8) Within fifteen (15) days after receipt of intimation of the selection of the Agency, the selected Agency shall pay the following Fees to the Authority :—

a. An amount equivalent to the Fees payable for six (6) months as a Security Deposit, and

b. Advance monthly fees payable for the first month.

c. If the Agency fails to pay the same within fifteen (15) days, the selection shall stand cancelled.

(9) Thereafter, an agreement shall be executed between the Agency and the Authority for putting up the advertisement at the specified location.

(10) Subsequently, the Agency shall make timely advance payments to the Authority for the monthly fees payable before the fifth (5th) of every month for which the fee is due.

(11) In the event of delayed payment, interest at the rate of 18 per cent per annum shall be levied.

(12) If the delay in payment exceeds three (3) months, the license shall be cancelled, and possession of the advertisement shall vest with the Maharashtra Maritime Board.

(13) The Security Deposit shall be refunded without interest upon expiry of the license period, subject to there being no breach of the terms and conditions of the agreement. In the event of breach of any terms and conditions, such amount as may be determined by the Maharashtra Maritime Board shall be forfeited from the Security Deposit.

**5. Period of License**

(1) The maximum License Period for any type of Advertisement shall be Ten (10) years.

(2) A period of six (6) months from the date of issuance of the License shall be given to the Licensee for obtaining all requisite permissions and approvals from the concerned authorities.

(3) The License Period of Ten (10) years shall commence immediately after completion of the said six-month period, irrespective of whether the advertisement structure is completed or operational. The Licensee shall be liable to pay the applicable License Fees from the commencement of the seventh month.

(4) The Licensee shall remove the Advertisement within ninety (90) days from the date of expiry of the license. The following conditions shall apply in this regard :—

a. The Licensee shall be liable to pay the monthly fees till the removal of the Advertisement.

b. Failure to comply with the above clause shall result in a penalty equivalent to the monthly Fees payable, along with an additional charge of 25% of the monthly Fees for each month of non-compliance.

c. In the event of any damage, injury, or loss arising due to failure in removing the Advertisement within ninety (90) days from the license expiry date, the Agency shall be fully and solely responsible for the costs and consequences of such damage, injury or loss incurred.

d. The Advertisement shall be treated as an unauthorised advertisement after the expiry of ninety (90) days from the license expiry date.

**6. Fixation of Minimum License Fees**

(1) Minimum License Fees will be calculated based on "The Schedule of Fees for Advertisement Permits" prescribed by the Brihanmumbai Municipal Corporation (BMC) from time to time, or any other relevant parameters or fees or rates prescribed by the Central or State Government or Local Administration or Government Entities.

(2) The participants in the bidding process should quote the Premium Fees that they are willing to pay over and above the Minimum License Fees.

(3) The license fee shall escalate by Ten percent (10%) after every 12 months cumulatively during the license period.

**7. Scrutiny Committee**

A Scrutiny Committee will be established by Maharashtra Maritime Board for the fixation of Minimum License Fees, preparation of Tender Document, and Scrutiny of Bids. Committee members shall include :—

a. Chief Port Officer (CPO), MMB - Chairperson

b. Deputy Collector, MMB – Member Secretary

c. Deputy Director of Town Planning (DDTP), MMB - Member

d. Financial Controller cum Chief Accounts Officer (CAFO), MMB - Member

e. Superintending Engineer (SE), MMB - Member.

**8. Provisions for Temporary Advertisement**

(1) An application has to be submitted for the display of Temporary Advertisements in the format prescribed by the Maharashtra Maritime Board.

(2) Maharashtra Maritime Board reserves the right to permit or deny permission.

(3) The Fees for Temporary Advertisements shall be the Minimum License Fees, calculated for the number of days of Temporary Advertisement.

(4) All requisite permissions and approvals for Temporary Advertisements shall be taken by the applicant.

**9. Duties and Responsibilities of Licensee**

(1) The Licensee shall ensure that the Advertisements are aesthetically designed and properly maintained in a clean, tidy, and safe condition at all times.

(2) The Licensee must ensure that advertisements of obscene, ostentatious nature or any other offensive message is not allowed to be displayed.

(3) The advertisement shall adhere to the Advertisement Standards Council of India Guidelines and all other applicable guidelines.

(4) The Licensee shall display or affix his name and License number of approved size, in the place allotted at the bottom corner of the Advertisement to facilitate identification of the Licensee. He shall also display the month and year of expiry of the License in symbols (viz 9/25 for September

2025, 7/26 for July 2026 etc.), the License number, Licensee name and contact number. The font size of the name of the Licensee should be of dimensions such that it shall be easily and clearly readable from the base level of the Advertisement, or as the case may be.

(5) During the License Period, the Licensee shall obtain a Public Liability Insurance policy as prescribed by the Authority, with regard to the rights, interests, and liabilities to third parties in cases of death or injury or damage to property.

**10. General Conditions**

(1) No modifications to the Advertisement shall be permitted during the period of License without the permission of the Authority.

(2) On any breach of terms and conditions of the agreement and the License committed by the Agency, MMB shall have the right to cancel the License if the Agency doesn't rectify the breach within the timeframe stipulated in the notice issued in this regard.

(3) Sub-leasing or transfer of the License by the Licensee to any other person or entity shall not be permitted under any circumstances.

(4) The Maharashtra Maritime Board shall not be responsible for any loss or damage to the Advertisement for any reason whatsoever.

PRADEEP P,
Chief Executive Officer,
Maharashtra Maritime Board, Mumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.